## जामीनपात्र वॉरंटनंतरही साध्वी प्रज्ञासिंह गैरहजर

### नव्याने जामीनपात्र वारंट

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मालेगाव येथे २००८ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटांशी संबंधित खटला अंतिम टप्प्यात पोहोचला असताना आणि विशेष न्यायालयाने जामीनपात्र वॉरंट बजावून उपस्थित राहण्याचे आदेश देऊनही खटल्यातील प्रमुख आरोपी व भाजप नेत्या साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर या बुधवारी न्यायालयात अनुपस्थित राहिल्या. त्यामुळे, विशेष न्यायालयाने त्यांच्या नावे नव्याने जामीनपात्र वॉरंट काढून त्यांना २ डिसेंबर रोजी न्यायालयात उपस्थित राहण्याचे आदेश दिले.

दुसरीकडे, साध्वी यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याने त्या खटल्याच्या सुनावणीसाठी उपस्थित राहू शकत नसल्याचे त्यांच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले. साध्वी यांच्यावरील उपचाराची कागदपत्रेही यावेळी न्यायालयात सादर करण्यात आली. त्यानंतर, विशेष न्यायालयाने साध्वी यांच्या नावे नव्याने जामीनपात्र अटक वॉरंट काढले. साक्षीपुरावे नोंदवण्यात आल्यानंतर राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) कायद्यांतर्गत स्थापन विशेष न्यायालयात या प्रकरणी अंतिम युक्तिवाद सुरू आहे.

# वांगणीतील विकासकावर ‘म्हाडा’ची कृपादृष्टी?

## म्हाडा भवनात विनाभाडे कार्यालयासाठी जागा; सोडतीच्या संगणकीय प्रणालीअंतर्गत विकासकाच्या घरांची विक्री

**मंगल हनवते, लोकसत्ता**

### गुन्हा दाखल करण्याची मागणी

हा विकासक गुरुवारी मुंबई मंडळासमोर हजर होऊन आपली बाजू मांडण्याची शक्यता आहे. असे असताना आता विकासकाविरोधात याप्रकरणी कठोर कारवाई करण्याची, म्हाडाच्या चिन्हाचा वापर केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी गिरणी कामगार संघटनांकडून होत आहे. त्याचबरोबर आता त्याचे कार्यालय म्हाडा भवनातून हटविण्याचीही मागणी होत आहे.



### अहवाल मागितला

याविषयी मुंबई मंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता त्यांनी कार्यालयाची जागा कशी देण्यात आली, का देण्यात आली, भाडे वसुली का केली जात नाही यासंबंधीचा अहवाल अधिकाऱ्यांकडून मागविण्यात आल्याचे सांगितले. तर कार्यालय रिकामे करण्यासंबंधीही विकासकाला निर्देश देण्यात आले आहेत. कार्यालय रिकामे केले नाही, तर ते टाळेबंद करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. महत्त्वाचे म्हणजे विकासकाकडून कार्यालयाचा ताबा दिल्यापासून आजपर्यंतचे भाडेही वसूल केले जाणार असल्याचेही या अधिकाऱ्याने सांगितले.

**मुंबई :** राज्यात एकही गृहप्रकल्प न राबविणाऱ्या विकासकाला पंतप्रधान आवास योजनेच्या नावाखाली राज्य सरकाने बिनव्याजी ४०० कोटींचे कर्ज दिले असून याच विकासकाशी वांगणीत गिरणी कामगारांसाठी ५१ हजार घरे बांधण्यासाठी करार केला आहे. राज्य सरकार या विकासकावर मेहरबान असतानाच म्हाडाने या विकासकाला म्हाडा भवनातच विनाभाडे कार्यालयासाठी जागा दिली आहे. महत्त्वाचे म्हणजे म्हाडा सोडतीच्या संगणकीय प्रणालीचा वापर या विकासकाच्या घरविक्रीसाठी केला जात आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून एका खासगी विकासकासाठी सरकारी यंत्रणा का राबत आहे, या विकासकावर म्हाडा मेहरबान का आहे, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.

चड्ढा डेव्हलपर्स अँड प्रमोटर्स या विकासकाला गिरणी कामगारांसाठी वांगणीत ५१ हजार घरे बांधण्याचे कंत्राट मिळाले आहे. मात्र ही घरे बांधण्याआधीच या विकासकाने संमती पत्राच्या नावे गिरणी कामगारांकडून पैसे उकळण्यास सुरुवात केली आहे. महत्त्वाचे म्हणजे यासाठी त्याने म्हाडाच्या चिन्हाचाही वापर केला असून म्हाडाला अंधारात ठेवून म्हाडाच्या नावे हा कारनामा केला आहे. गिरणी कामगार संघटनांनी याबाबत तक्रार केल्यानंतर आणि यासंबंधीचे सविस्तर वृत्त ‘लोकसत्ता’मध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर म्हाडाच्या मुंबई मंडळाने या विकासकाला ‘कारणे दाखवा’ नोटीस बजावली.

वांद्रे येथील म्हाडा भवनाच्या आवारात तळीये दरडग्रस्तांसाठी बांधण्यात येणाऱ्या घरांचे नमुने (सॅम्पल फ्लॅट) तयार करण्यात आले आहेत. याच घरांमध्ये काही वर्षांपूर्वी या विकासकाला कार्यालयासाठी म्हाडाने जागा दिली आहे.

आश्चर्याची बाब म्हणजे यासाठी विकासकाकडून कोणतेही भाडे वसूल केले जात नसल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.

चड्ढा विकासकाला कार्यालयासाठी जागा देत आलीच, त्याचबरोबर म्हाडाच्या सोडतीसाठीची संगणकीय प्रणाली या विकासकाच्या वांगणीतील घरांच्या विक्रीसाठी वापरली जात आहे. दरम्यान म्हाडाच्या संकेतस्थळावर या विकासकाच्या प्रकल्पाची जाहिरातही झळकताना दिसत आहे. या सर्व गोष्टींचे गांभीर्य लक्षात घेता म्हाडाने त्वरित या विकासकाविरोधात कठोर कारवाई करून कार्यालय रिकामे करून घ्यावे, तसेच संगणकीय प्रणालीचा वापर या विकासकाच्या घरांसाठी करणे तात्काळ बंद करावे, अशीही मागणी जोर धरू लागली आहे.

# अंबर दलाल प्रकरणात २२ कोटींच्या मालमत्तेवर टाच

### ११०० कोटींचा गैरव्यवहार

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** दोन हजारांहून अधिक गुंतवणूकदारांची ११०० कोटी रुपयांची फसवणूक करणारा सनदी लेखापाल (सीए) अंबर दलाल विरोधात दाखल गुन्ह्यांत सक्तवसुली संचलनालयाने २२ कोटी ८६ लाख रुपयांच्या मालमत्तेवर टाच आणली आहे. त्यात मुंबई व ठाण्यातील सदनिका व जमिनींचा समावेश आहे.

याशिवाय अंबर दलाल, त्याचे कुटुंबीय आणि त्याची साथीदार रश्मी प्रसाद यांच्या विमा पॉलिसी आणि गुंतवणूक यांचाही त्यात समावेश आहे. यापूर्वी, दुबईतील रश्मी प्रसाद यांच्या मालकीच्या (सुमारे ४.९५ कोटी रुपये किंमत) एका सदनिकेवर ईडीने टाच आणली होती. ओशिवरा पोलिसांनी १५ मार्च रोजी रिट्झ कन्सल्टन्सी सर्व्हिसेस कंपनीचे मालक दलाल यांच्याविरुद्ध सुरुवातीला डझनभर गुंतवणूकदारांची ५४ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता.

### अमेरिका व संयुक्त अरब अमिरातीतील गुंतवणूकदारांचीही फसवणूक

कमोडिटीमध्ये ट्रेडिंग करून गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याच्या नावाखाली आरोपीने २००९ भारतीय गुंतवणूकदारांची फसवणूक केली. त्यात ११०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. पण हे संपूर्ण प्रकरण खूप मोठे असून अमेरिका व संयुक्त अरब अमिराती (यूएई) येथीलही अनेक गुंतवणूकदारांची फसवणूक झाल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

# नृत्य दिग्दर्शक रेमो डिसोजाची गुन्हे शाखेकडून चौकशी

## तरुणांची १२ कोटींनी फसवणूक केल्याचा आरोप

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** भाईंदरमधील ‘वी अनबिटेबल’ या डान्सग्रुपच्या तरुणांची १२ कोटींची फसवणूक केल्याप्रकरणी ग्रुपचा बॉलिवूडचा नृत्यदिग्दर्शक रेमो डिसोजा आणि त्याची पत्नी लिझेल डिसोजा यांची गुन्हे शाखेच्या पथकाने वसई येथील कार्यालयात तब्बल सहा तास चौकशी केली. मात्र नेमका तपशील समजू शकलेला नाही. सध्या या प्रकरणाची चौकशी सुरू असून पोलिसांनी अधिक भाष्य करण्याचे टाळले.



डान्स ग्रुपची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी मिरा रोड पोलीस ठाण्यात ७ जणांविरोधात गुन्हा दाखल आहे. त्यात ग्रुपचा व्यवस्थापक, बॉलीवूड मधील प्रसिध्द नृत्य दिग्दर्शक रेमो डिसोजा, त्यांची पत्नी लिझेल डिसोजा आणि एका पोलिसाचाही समावेश आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर या प्रकरणाचा मिरा भाईंदर वसई विरार पोलिसांच्या गुन्हे शाखा-२ कडे वर्ग करण्यात आला आहे. त्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला आहे

आरोपींमध्ये रेमो डिसोजा, त्यांची पत्नी लिझेल डिसोजा, व्यवस्थापक ओमप्रकाश चौहान, आयुक्तालयातील पोलीस कर्मचारी विनोद राऊत, रमेश गुप्ता, रोहित जाधव आणि फेम प्रॉडक्शन कंपनी अशा ७ जणांचा सहभाग आहे. आरोपींनी एकूण ११ कोटी ९६ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे.

# मानवसेवा करणाऱ्या संस्थांची गरज

## डॉ. अभय बंग यांचे प्रतिपादन; जमनालाल बजाज पुरस्कार प्रदान

**लोकसत्ता प्रतिनिधी**



रचनात्मक कार्याबद्दल झारखंडच्या गिरीजा नंदन यांचा डॉ. अभय बंग यांच्या हस्ते जमनालाल बजाज पुरस्काराने बुधवारी मुंबईत सन्मान करण्यात आला.

**मुंबई :** आयुष्य एक आहे आणि या जगात अफाट पैसा आहे, त्यामुळे पैसे कमावणे हे ध्येय न ठेवता सेवा हे ध्येय ठेवले तरच आपण समाजाला मदत करू या विचारांनी प्रभावित होऊनच मी आणि माझी पत्नी राणी हिने वर्धाऐवजी गडचिरोली येथे जाऊन जनसेवा करण्याचा निर्णय घेतला. जिथे सोयीसुविधांचा अभाव असतो तिथे मनुष्य सेवा करण्याची खऱ्या अर्थाने गरज असते. पण जिथे सोयीसुविधा पटकन उपलब्ध आहेत तिथे आपण गर्दी करणे निरर्थक आहे, असे मत व्यक्त करत ‘सर्च’ या संस्थेचे प्रमुख आणि सामाजिक कार्यकर्ते अभय बंग यांनी गडचिरोली जिल्ह्यातच जनसेवा करण्याचा निर्णय का घेतल्याचे बुधवारी ४६ व्या जमनालाल बजाज पुरस्कार सोहळ्यात स्पष्ट केले.

‘जमनालाल बजाज फाउंडेशन’तर्फे देण्यात येणाऱ्या जमनालाल बजाज पुरस्कारांचे बुधवार १३ नोव्हेंबर रोजी रॉयल ऑपेरा हाऊस, चर्नी रोड येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. अभय बंग हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. तर, या सोहळ्यात बजाज फाऊंडेशनच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष शेखर बजाज, नॅशनल इनोव्हेशन फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. आर. ए. माशेलकर आदि

> माझ्या वडिलांना जमनालाल बजाज यांनीच वर्धा येथे शिक्षक म्हणून काम करण्याचा सल्ला दिला होता. ज्यामुळे ते पुढे समाजसेवा करत महात्मा गांधी यांच्यासोबत ‘चले जाव’ चळवळीत सहभागी होऊ शकले. त्यामुळेच त्यांनी माझ्या मनात गांधीवाद रुजवला.
>
> **- अभय बंग,** अध्यक्ष, ‘सर्च’ संस्था

मान्यवर मंडळी उपस्थित होते. या सोहळ्यात गिरिजा नंदन झारखंड, (रचनात्मक कार्य पुरस्कार), रश्मी भारती उत्तराखंड, (ग्रामीण विकासासाठी विज्ञान व तंत्रज्ञान), डॉ. तुलसी मुंडा ओडिसा, (महिला व बालविकास आणि कल्याण), रेव्हरंड एरिक कुमेडिसा, डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ कॉंगो (गांधीजींच्या मूल्यांचा प्रसार आंतरराष्ट्रीय पुरस्कार ) या मान्यवर मंडळींना मानपत्र, सन्मानचिन्ह आणि २० लाख रुपये रोख देऊन सन्मानित करण्यात आले.

जमनालाल बजाज पुरस्काराचे विजेते गांधीवादी तत्त्वांचे जतन आणि प्रसार करण्यासाठी कार्यात आहेत. त्यामुळे आम्ही त्यांच्या उल्लेखनीय ध्येयसिद्धीचा गौरव करत आहोतच, त्याचप्रमाणे त्यांनी त्यांच्या कार्याप्रति दाखविलेल्या निष्ठेचाही सन्मान करतो. सत्य, अहिंसा आणि एकता या शाश्वत मूल्यांचे प्रतिबिंब या व्यक्तींमध्ये असून हे पुरस्कारविजेते सर्वांसाठी चांगले जग निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत.

जमनालाल बजाज आणि गांधीजींचे आदर्श काळाच्या मर्यादेत अडकलेले नाहीत, ते आजही अर्थपूर्ण बदल घडवण्यासाठी प्रेरणा देत आहेत, हेच या पुरस्कार विजेत्यांच्या योगदानातून दिसून येते, असे मत या सोहळ्यात डॉ. आर. ए. माशेलकर यांनी व्यक्त केले.

# तिसऱ्या आघाडीचा फायदा कोणाला?

**अशोक अडसूळ, लोकसत्ता**

> २००९ मध्ये तिसऱ्या आघाडीचा ‘रिडालोस’ नावाने जोरकस प्रयत्न झाला होता. आघाडीची तेव्हा एकही जागा आली नव्हती. यावेळी बच्चू कडू यांच्या आल्या तर एकदोन जागा येतील. बाकी शेतीच्या प्रश्नी ठाम भूमिका नसलेली ही ऐनवेळची तिसरी आघाडी विधानसभेच्या निवडणुकीत पूर्णपणे भुईसपाट होईल यात शंका नाही.
>
> **- प्रा. डॉ. जालिंदर पाटील,** स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माजी प्रदेशाध्यक्ष, कोल्हापूर.

**मुंबई :** डावे व समाजवादी पक्षांविना प्रथमच राज्यात अस्तित्वात आलेल्या ‘परिवर्तन महाशक्ती’ आघाडीने विधानसभा निवडणुकीत १०६ उमेदवार उभे केले असून त्यामध्ये ७ आजी-माजी आमदार आहेत. सहा पक्षांच्या या आघाडीने ‘शेतकरी-दिव्यांग-मराठा’ असे समीकरण बनवले असून ही कथित तिसरी आघाडी सत्ताधारी महायुतीला की विरोधकांच्या ‘मविआ’ची मते खाणार याविषयी अंदाज बांधले जात आहेत.

छत्रपती संभाजी राजे यांच्या ‘महाराष्ट्र स्वराज्य पक्षा’चे ३३, बच्चू कडू यांच्या ‘प्रहार जनशक्ती पक्षा’चे ३७, राजू शेट्टी यांच्या ‘स्वाभीमानी पक्षा’चे १५, रिपब्लिकन पक्षा’चे (खोरिप) ५, जय विदर्भ पार्टीचे ५, शंकर धोंडगे यांच्या ‘महाराष्ट्र राज्य समिती’चे ४, वामनराव चटप यांच्या ‘स्वतंत्र भारत पक्षा’चे ४ आणि नारायण अंकुशे यांच्या ‘भारतीय जवान किसान पार्टी’ने २ असे उमेदवार विधानसभेच्या मैदानात आहेत. आघाडीचे उमेदवार वेगवेगळ्या चिन्हावर विधानसभा लढवत आहेत.

छत्रपती संभाजी राजे यांचा पक्ष मराठा आरक्षणाच्या चळवळीतून निर्माण झाला आहे. या आघाडीतील घटक पक्षांचा शेतकरी जात समूह हा पाया आहे. त्यामुळे या आघाडीचे ‘शेतकरी-दिव्यांग-मराठा’ असे समीकरण बनले आहे.

# मंदीच्या सावटाने बाजार गडगडला!

(पान १ वरून) अंदाजे १.२० लाख कोटी रुपये (सुमारे १४ अब्ज डॉलर) काढून घेतले आहेत. डॉलरच्या बळकटीकरणामुळे जागतिक स्तरावर उदयोन्मुख-बाजारातील मालमत्तांवर ताण वाढला आहे. ट्रम्प यांच्या उदयोन्मुख-बाजारासंबंधित धोरणांमुळे व्यापारात व्यत्यय निर्माण होण्याची आणि त्या परिणामी पुन्हा एकदा महागाई वाढण्याची शक्यता आहे. ट्रम्प यांच्या ‘अमेरिका प्रथम’ धोरणाचा परदेशी गुंतवणूक आणि व्यापारावर काय परिणाम करू शकतात याबद्दल अद्याप अनिश्चितता आहे. परिणामी, एमएससीआय आशिया पॅसिफिक निर्देशांक दोन महिन्यांतील नीचांकी पातळीवर घसरल्याने आशियाई बाजारपेठांना त्याची झळ जाणवू लागली आहे. अमेरिकेची मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हसह इतर देशांच्या मध्यवर्ती बँकांकडून व्याज दरकपातीचे चक्र सुरू होऊनही, भारतीय रिझर्व्ह बँकेने आपली महागाईसंबंधाने ताठर भूमिका कायम ठेवली आहे. लांबलेला मान्सून आणि हवामानातील प्रतिकूल बदलांमुळे अन्नधान्याच्या किमती वाढल्याने दरकपातीची शक्यता धूसर झाली आहे. यातून परदेशी गुंतवणूकदारांमधील स्थानिक बाजाराचे आकर्षण आणखीच कमी होणार आहे.

> कंपन्यांची कमकुवत मिळकत कामगिरी, महागाई दराचा १४ महिन्यांतील उच्चांक आणि परदेशी गुंतवणूकदारांच्या विक्रीच्या माऱ्याने गुंतवणूकदारांच्या भावनांवर नकारार्थी परिणाम झाला आहे. आता रिझर्व्ह बँकेकडून नजीकच्या कालावधीत दरकपातीची आशा आहे.
>
> **- विनोद नायर,** संशोधन प्रमुख, जिओजित फायनान्शियल सर्व्हिसेस

> उदयोन्मुख बाजारांसाठी, डॉलरची मजबुती आणि अमेरिकी रोख्यांच्या परताव्यामध्ये ४.४२ पर्यंतची तीव्र वाढ ही चिंतेची बाब आहे. रोख्यांवरील वाढलेल्या परताव्यामुळे बाजारपेठांतील गुंतलेला पैसा माघारी फिरून पुन्हा अमेरिकेची वाट धरेल. भारताच्या भांडवली बाजारासाठी ही बाब नकारात्मकच आहे.
>
> **- डॉ. व्ही के विजयकुमार,** इक्विटी प्रमुख, जिओजित फायनान्शियल सर्व्हिसेस


**SICOM LIMITED**

**नोंदणीकृत कार्यालय :** सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, बिल्डिंग नं. ४, ६वा मजला, गुरू हरगोविंदजी रोड, चकाला, अंधेरी (पू), मुंबई - ४०० ०९३.
**टेलि न.:** ०२२-६६५७ २७००, **वेबसाइट :** www.sicomindia.com

**जाहीर ई-लिलाव-नि-विक्री सूचना**

आम जनतेस तसेच विशेषकरून **"सिकॉम लिमिटेड"**चे (**"सिकॉम"**) ऋणको / गहाणकार व हमीदारांना याद्वारा सूचना देण्यात येते की, "सिकॉम"कडे खाली नमूद केलेल्या गहाण असलेल्या मालमत्तेचा एकमेव ताबा सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ [**सरफेसी ॲक्ट**]च्या सेक्शन १३(४) च्या तरतुदीअंतर्गत "सिकॉम"ने घेतला होता आणि सदर मालमत्तेची विक्री https://eauction.auctiontiger.net यावरून **१८ डिसेंबर, २०२४ रोजी स. ११.३० व दु. ०१.०० दरम्यान** जाहीर ई-लिलावाद्वारा **मेसर्स बेकर टेक्निकल सर्व्हिसेस प्रा. लि., नारंग डेव्हलपर्स प्रा. लि. व श्री. बालाजी होम्स प्रा. लि. (ऋणको)** कडील देणींच्या वसुलीकरिता **"जसे आहे तेथे आहे, जसे आहे जे काही आहे, जे काही आहे तेथे आहे तसेच कोणत्याही आधाराशिवाय आणि कोणत्याही वॉरंटी व क्षतिपूर्तीशिवाय"** या तत्वावर जाहीर ई-लिलावाद्वारा करण्यात येणार आहे. प्रस्ताव याखाली नमूद केलेल्या मालमत्तेसंबंधित स्वारस्य असलेल्या पक्षकारांकडून एनईएफटी/आरटीजीएस किंवा नॅशनलाईज्ड बँक/ शेड्युल्ड कमर्शियल बँकेच्या डीमांड ड्राफ्टद्वारा देय इसारा रक्कम ठेव (इरठे) समवेत मोहोरबंद लिफाफ्यात मागविण्यात आले आहेत.

| लॉट नं. | मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत (रु. कोटीत) | इसारा रक्कम ठेव (रु. कोटीत) |
|---|---|---|---|
| लॉट १ | सर्व समाविष्ट प्रीमायसेस असलेला फ्लॅट मोजमापाचा २००० चौ.फू. कार्पेट एरिआ ३३०० चौ.फू.शी तुल्य किंवा त्यासुमारे विक्रीयोग्य एरिआ, "नारंग मनोर" म्हणून ज्ञात असलेल्या बिल्डिंगच्या संपूर्ण पहिल्या मजल्यावरील, जमीन धारण केलेला प्लॉट नं. ९६-बी, सीएस नं. एफ/४५४/बी यावर बांधकाम केलेला, येथे स्थित - १५वा रोड, बांद्रा (प), मुंबई-४०००५०, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मर्यादेत, ता. बांद्रा, जिल्हा व नोंदणी उप-जिल्हा मुंबई उपनगर. बेकर टेक्निकल सर्व्हिसेस प्रा. लि. द्वारा गहाण असलेला **गहाणकाराचे नाव : बेकर टेक्निकल सर्व्हिसेस प्रा. लि.** | ८.५५ | ०.८५ |
| लॉट २ | सर्व समाविष्ट प्रीमायसेस असलेला फ्लॅट मोजमापाचा १३०० चौ.फू. कार्पेट एरिआ + टेरेस मोजमापाची ४०० चौ.फू. कार्पेट एरिआ एकूण १७०० चौ.फू.शी तुल्य किंवा त्यासुमारे विक्रीयोग्य एरिआ, "नारंग मनोर" म्हणून ज्ञात असलेल्या बिल्डिंगच्या संपूर्ण पाचव्या मजल्यावरील, जमीन धारण केलेला प्लॉट नं. ९६-बी, सीएस नं. एफ/४५४/बी यावर बांधकाम केलेला, येथे स्थित - १५वा रोड, बांद्रा (प), मुंबई-४०००५०, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मर्यादेत, ता. बांद्रा, जिल्हा व नोंदणी उप-जिल्हा मुंबई उपनगर. सुनिता डी. नारंग यांच्याद्वारा गहाण असलेला **गहाणकाराचे नाव : सुनिता डी. नारंग** | ७.०१ | ०.७० |
| लॉट ३ | सर्व समाविष्ट प्रीमायसेस असलेला फ्लॅट मोजमापाचा १२०० चौ.फू. कार्पेट एरिआ २००० चौ.फू.शी तुल्य किंवा त्यासुमारे विक्रीयोग्य एरिआ, "नारंग मनोर" म्हणून ज्ञात असलेल्या बिल्डिंगच्या संपूर्ण सहाव्या मजल्यावरील, जमीन धारण केलेला प्लॉट नं. ९६-बी, सीएस नं. एफ/४५४/बी यावर बांधकाम केलेला, येथे स्थित - १५वा रोड, बांद्रा (प), मुंबई-४०००५०, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मर्यादेत, ता. बांद्रा, जिल्हा व नोंदणी उप-जिल्हा मुंबई उपनगर. दिलीप नारंग यांच्याद्वारा गहाण असलेला **गहाणकाराचे नाव : दिलीप नारंग** | ५.६९ | ०.५७ |

| | | |
|---|---|---|
| ऋणकोचे नाव | : | बेकर टेक्निकल सर्व्हिसेस प्रा. लि., नारंग डेव्हलपर्स प्रा. लि. व श्री बालाजी होम्स प्रा. लि. |
| वसूल करावयाची "सिकॉम"ची थकित देणी (मुद्दल + व्याज) | : | * रु. ५६.३६ कोटी (मुद्दल + व्याज) ३० सप्टेंबर २०२४ रोजी प्रमाणे (त्यावरील पुढील व्याजासह) |
| पाहाणीची तारीख व वेळ | : | २२ नोव्हेंबर, २०२४ रोजी स. ११.०० व दु.०४.०० दरम्यान |
| ई-लिलावाची तारीख व वेळ | : | १८ डिसेंबर,२०२४ रोजी<br>लॉट १ — स. ११.३० ते दु.१२.३०<br>लॉट २ — दु. १२.४५ ते दु.०१.४५<br>लॉट ३ — दु. ०२.०० ते दु.०३.०० |

*** वरील सुरक्षा नमूद केलेल्या ऋणकोंची असलेल्या खालील कर्ज देणींकरिता एकसमयेकरून क्रमवारीत आहेत. बेकर टेक्निकल सर्व्हिसेस प्रा. लि. (पीओडी रु. ५.६५ कोटी, आयओडी रु. १९.६० कोटी); श्री बालाजी होम्स प्रा. लि. (पीओडी रु. ५.६५ कोटी, आयओडी रु. २०.१२ कोटी); नारंग डेव्हलपर्स प्रा. लि. (पीओडी रु. १.५० कोटी, आयओडी रु. ३.८५ कोटी) ३० सप्टेंबर २०२४ रोजीप्रमाणे.**

**लिलावाच्या शर्ती व अटी :**

१. मत्ता वर नमूद केल्यानुसार स्वतंत्र लॉट्समध्ये (लॉट १, लॉट २ व लॉट ३) खरेदीकरिता उपलब्ध आहे. **बोलीदार प्रत्येक लॉटकरिता स्वतंत्र इरठेसमवेत स्वतंत्ररीत्या प्रत्येक लॉटकरिता त्याचा/ तिचा/ त्यांचा प्रस्ताव/ बोली सादर करू शकतील.**
२. **बोली वृद्धी रक्कम रु. ५,००,०००/- आणि त्या पटीत असणार आहे.**
३. भावी बोलीदार सेवा-पुरवठाकार **मेसर्स ई-प्रोक्युअरमेंट टेक्नोलॉजीस लि. (ऑक्शन टायगर)** आणि श्री. राम शर्मा (मोबा. नं. ८०००२३२९७), ईमेल आयडी - ramprasad@auctiontiger.net हेल्पलाइन -ईमेल आयडी : support@auctiontiger.net यांच्याकडून ऑनलाइन ट्रेनिंगचा लाभ घेवू शकतील.
४. भावी बोलीदारांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता www.auctiontiger.in या बेवसाइटला भेट द्यावी. लिलाव विक्री वर नमूद केलेल्या मालमत्तेच्या **विक्रीच्या सर्वसाधारण शर्ती व अटीं**च्या विषयाधीन आहे. ज्याकरिता स्वतंत्र प्रत www.sicomindia.com किंवा www.auctiontiger.in यावरून बोलीदाराद्वारा प्राप्त करता येईल. जर विक्रीच्या सर्वसाधारण शर्ती व अटींच्या प्रती बोलीदार प्राप्त करू शकला नाही, तर बोलीदाराने त्या प्राप्त केल्या आहेत, पाहिल्या आहेत, पडताळल्या आहेत व स्वीकारल्या आहेत असे समजण्यात येईल.
५. जाहीर लिलावात सहभागी होण्याकरिता स्वारस्य असलेले बोलीदार/ प्रस्तावदाराने **१६ डिसेंबर, २०२४ रोजी दु. ०४.०० वा. पर्यंत** सादर करावयाची मुंबई येथे देय "सिकॉम लिमिटेड" च्या नावे राष्ट्रीयीकृत बँक/ शेड्यूल्ड कमर्शियल बँकेवर काढलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारा खालील पद्धतीत **इसारा रक्कम ठेव (इरठे)** भरावयाची आहे.

| | इरठे (रु. कोटीत) |
|---|---|
| लॉट १ | ०.८५ |
| लॉट २ | ०.७० |
| लॉट ३ | ०.५७ |

६. इरठे खाली दिलेल्या तपशीलानुसार खात्यामध्ये याखाली दिलेल्या अनुसूचीप्रमाणे **१६ डिसेंबर, २०२४ रोजी दु. ०४.०० वा.** पर्यंत आरटीजीएस/एनईएफटीद्वारा सुद्धा भरता येईल.

| | |
|---|---|
| लाभाधिकारीचे नाव | "सिकॉम लिमिटेड" |
| लाभाधिकारी बँकेचे नाव | एचडीएफसी बँक, शंकर नगर ब्रँच, नागपूर |
| लाभाधिकारी खाते क्र. | ०१०२०३५००००१७८ |
| शाखेचा पत्ता | शंकर नगर ब्रँच, नागपूर |
| आयएफएससी कोड | एचडीएफसी०००0१०२ |

७. यशस्वी बोलीदार / खरीददारांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी खालीलनुसार प्रदान वेळापत्रकाचे अनुसरण करावे :
ए. प्रस्ताव रकमेच्या २५%चे पुढील प्रदान (इरठे म्हणून प्रदान केलेली रक्कम वजा करून) त्वरित किंवा उशिरात उशिरा "सिकॉम"द्वारा विक्रीच्या निश्चितीकरणावर कामाच्या पुढील दिवशी "सिकॉम लि."च्या नावे मुंबई येथे देय कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँक / शेड्यूल्ड कमर्शियल बँकेवर काढलेल्या डिमांड ड्राफ्ट किंवा आरटीजीएस / एनईएफटीद्वारा भरावयाची आहे.
बी. खरेदी किंमतीच्या ७५% उर्वरित रक्कम "सिकॉम"द्वारा प्रस्तावाच्या निश्चितीकरणावर आणि स्वीकृतीच्या तारखेपासून १५ दिवसांत (पंधरा दिवस) किंवा तत्पूर्वी आणि जर १५वा दिवस रविवार किंवा अन्य सुटीचा दिवस असल्यास तर कामाच्या पुढील दिवशी प्रदान करावयाची आहे.
८. प्रस्ताव जो सर्वसाधारण शर्ती व अटींची स्वीकृती व स्वाक्षरीकृत प्रती समवेत नसल्यास आणि आवश्यक इरठे नसलेला किंवा वरील तारीख व वेळेनंतर स्वाकारलेला प्रस्ताव किंवा त्यात विहित राखीव रकमेखालील रक्कम स्वीकारल्यास त्याचा विचार केला जाणार नाही / अवैध निविदा म्हणून समजण्यात येईल आणि तदनुसार नामंजूर करण्यात येईल.
९. "सिकॉम" उच्चत्तर बोली स्वीकारण्यास किंवा कोणताही प्रस्ताव स्वीकारण्यास बांधील नाही आणि कोणताही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारील किंवा नामंजूर करील, जे त्यांच्या एकमेव स्वेच्छाधिकारावर उचित वाटेल.
१०. विक्री "सिकॉम लि."च्या व्यवस्थापनाद्वारे अंतिम मान्यतेच्या विषयाधीन असणार आहे.
११. "सिकॉम लि." त्याकरिता कोणतेही कारण न देता कोणत्याही स्तरावर जाहीर लिलाव प्रक्रीया रद्द करण्याचा/ पुढे ढकलण्याचा हक्क राखून ठेवीत आहेत.
१२. वर नमूद केलेल्या गहाणवट मालमत्तेची विक्री **"जसे आहे तेथे आहे, जसे आहे जे काही आहे, जे काही आहे तेथे आहे तसेच कोणत्याही आधाराशिवाय आणि कोणत्याही वॉरंटी व क्षतिपूर्तीशिवाय"** या तत्त्वावर करण्यात येत आहे.
१३. "सिकॉम लि."चे उत्तम ज्ञान व माहितीनुसार "सिकॉम"वगळता व जतन केलेल्या विद्यमान मालमत्तेवर तेथे कोणतेही भार नाहीत. बोलीदार, त्याच्या/ तिच्या/ त्यांच्याद्वारा सर्व बाबतीत समाधान करून घेवू शकतील, परंतु कोणताही आकार, धारणाधिकार, कर किंवा अन्य देणीच्या मर्यादेत नसेल. बोलीदारास याअधिक सल्ला देण्यात येतो की, त्याने/ तिने/ त्यांनी स्वतः उक्त मालमत्तेसंबंधित यथावकाश माहिती मिळवावी. "सिकॉम लि." विक्रीअंतर्गत मालमत्तेच्या बाबतीत कोणताही आकार, धारणाधिकार, भार, मालमत्ता कर किंवा कोणतीही अन्य देणी याकरिता जबाबदार असणार नाहीत. आत्तापर्यंतची देणी आणि तारखेनुसार सर्व सांविधिक दायित्वे/ कर / देखभाल शूल्क/ विद्युत/ पाणी आकार व म्युनिसिपल आकार, इ. बोलीदाराद्वारा निश्चित करावयाचे आहेत आणि यशस्वी बोलीदार / खरीददाराद्वारा सोसावयाचे आहेत. "सिकॉम लि." त्याकरिता कोणत्याही माहितीची तरतूद करण्याची किंवा गहाणवट मालमत्तेवरील जे काही असेल त्या स्वरूपाच्या कोणत्याही आकाराचे प्रदान करण्याची कोणतीही जबाबदारी घेत नाही.
१४. जीएसटीचे (गुड्स अँड सर्व्हिस टॅक्स) प्रदान निश्चित करणे व प्रदान करण्याची जबाबदारी खरीददार/ यशस्वी बोलीदाराची असणार आहे, जी यशस्वी बोलीदार/ खरीददाराद्वारा प्रस्तावित किंमतीच्या अधिक व त्यावरील असली पाहिजे.
१५. आयकर कायद्याच्या कलम १९४ आय ए अंतर्गत आयकराच्या अनुसार विक्रीच्या विचाराधीन १% (एक टक्का)च्या प्रदानाकरिता यशस्वी बोलीदार/ खरीददाराची जबाबदारी असेल. सदर आयकर "सिकॉम"करिता खरीददार/ यशस्वी बोलीदाराद्वारा दिलेल्या किंमतीवर प्रदान करावयाचे आहे आणि "सिकॉम"ला त्यावरील कोणतीही वजातीचा कोणताही प्रकार/ प्रणालीच्या विषयाधीन असल्याशिवाय प्रस्ताव / बोली किंमत मिळेल.
१६. **लिलावाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे :**

| | | |
|---|---|---|
| १. | मालमत्तेची पाहाणी | २२ नोव्हेंबर, २०२४ रोजी स. ११.०० पासून ते दु. ०४.०० वा पर्यंत |
| २. | इसारा रकमेसह बोली स्वीकारण्याकरिता आणि प्रदानाच्या पुराव्यासह कागदपत्रांच्या अपलोडींगकरिता शेवटची तारीख | १६ डिसेंबर, २०२४ रोजी दु. ०४.०० वा. पर्यंत (दोन्हीकरिता - डीडी किंवा आरटीजीएस/ एनईएफटी) |
| ३. | जाहीर ई-लिलाव : तारीख व वेळ | १८ डिसेंबर, २०२४<br>लॉट १ — स. ११.३० ते दु. १२.३०<br>लॉट २ — दु. १२.४५ ते दु.०१.४५<br>लॉट ३ — दु. ०२.०० ते दु.०३.०० |

**अधिक तपशील आणि विक्रीच्या शर्ती व अटींकरिता कृपया संपर्क साधावा**

| | |
|---|---|
| श्री. राजेंद्र भोसले : | टेलि (०२२)-६६५७२७२४, मोबा. ९८३३५४६३४९, ईमेल : rbhosale@sicomindia.com |
| श्री. ओमकार वेदक | टेलि (०२२)-६६५७२७०६, मोबा. ९३२३५५४६९७, ईमेल : ovedak@sicomindia.com |

**ऋणको/ गहाणकार/ हमीदारांकरिता सूचना**

ही विक्री सूचना लिलाव विक्रीच्या तारखे दिवशी किंवा तत्पूर्वी मासिक व्याज, किंमत व आकार, इ. सह व्याज आणि वरीलनुसार देणींच्या प्रदानाकरिता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ८(६) अंतर्गत पूर्वोक्त खात्यांतील ऋणको/ गहाणकार/ हमीदारांकरिता सुद्धा आहे, त्यास असमर्थ ठरल्यास वर नमूद केलेल्या तारीख व वेळेत मालमत्तेचा लिलाव/ विक्री करण्यात येणार आहे आणि उर्वरित देणी, जर असल्यास, त्यांच्याकडून व्याज व किंमतीसह त्यानुसार वसूल करण्यात येणार आहे.

**दिनांक :** १४ नोव्हेंबर, २०२४ **स्वाक्षरी/-**
**स्थळ :** मुंबई **प्रधिकृत अधिकारी, सिकॉम लिमिटेड**



**पंजाब नॅशनल बँक** ....विश्वासाचे प्रतिक! punjab national bank ...the name you can BANK upon!

**सर्कल सस्त्रा सेंटर सुरत**

**पहिला मजला, मेघानी टॉवर, स्टेशन रोड, सुरत - ३९५००३, फोन : ०२६१-२४५४५४३ ईमेल : cs8323@pnb.co.in**

**परिशिष्ट-IV [रुल ८(१) पाहा)] ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)**

ज्याअर्थी, **"पंजाब नॅशनल बँके"**चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ यासह वाचलेल्या सेक्शन १३ अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत पुढील व्याज व खर्च यासह **२८.०७.२०२४ रोजीप्रमाणे (२०.०६.२०२४ पर्यंत व्याज अंतर्भूत) रु. ३२,५७,७९२.२६ (रुपये बत्तीस लाख सत्तावन्न हजार सातशे ब्याण्णव व पैसे सव्वीस फक्त)** असलेल्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता **ऋणको मेसर्स गन्नथ फॅबटेक्स प्रा. लि. (ऋणको), श्रीमती रोषणी खैतान (संचालक व हमीदार) आणि श्री. अमितकुमार खैतान (संचालक व हमीदार/ गहाणकार)** यांच्यावर फर्माविणारी दिनांकित **३०.०७.२०२४** मागणी सूचना निर्गमित केली आहे.

ऋणको हमीदार/ गहाणकार रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, याद्वारा ऋणको/ हमीदार/ गहाणकार तसेच आम जनतेस सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी आज दिनांक **१२ नोव्हेंबर, २०२४** रोजी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८ यासह वाचलेल्या ॲक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत त्याला/ तिला प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

विशेषकरून ऋणको/ हमीदार/ गहाणकार तसेच आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार संपूर्ण **२८.०७.२०२४ रोजीप्रमाणे (२०.०६.२०२४ पर्यंत व्याज अंतर्भूत) रु. ३२,५७,७९२.२६ (रुपये बत्तीस लाख सत्तावन्न हजार सातशे ब्याण्णव व पैसे सव्वीस फक्त)** या रकमेकरिता **"पंजाब नॅशनल बँके"**च्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे.

**सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता ॲक्टच्या सेक्शन १३ च्या सब-सेक्शन (८) च्या तरतुदींकडे ऋणकोचे लक्ष वेधीत आहोत.**

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

पुढील स्थावर मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - फॅक्टरी स्वरूपात जी जमीन धारण केलेला प्लॉट नं जी-१२ यावर स्थित असलेली, नवापूर इंडस्ट्रियल एरिआतील, कोथाडेच्या व्हिलेज मर्यादेत आणि नवापूर म्युनिसिपल काउंसिल, तालुका नवापूर व नोंदणी जिल्हा नंदूरबारच्या मर्यादेबाहेरील, समाविष्ट मोजमापाची ७५०.०० चौ.मी. किंवा त्यासुमारे आणि त्यावरील फॅक्टरीचे बांधकाम. मेसर्स गन्नथ फॅबटेक्स प्रा. लि.च्या मालकीची आणि पुढीलप्रमाणे सिमित : **पूर्व** : एमआयडीसी रोड २५ मी., **पश्चिम** : ओपन स्पेस-४, **उत्तर** : प्लॉट नं. जी-११, **दक्षिण** : प्लॉट नं. जी-१३.

**दिनांक : १२.११.२०२४ स्थळ : सुरत** **प्राधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक**



**Asian** Energy Services

**एशियन एनर्जी सर्व्हिसेस लिमिटेड**

**सीआयएन :** L23200MH1992PLC318353
नोंदणीकृत कार्यालय : ३बी, ३ रा मजला, ओंकार एस्क्वेअर, चुनाभट्टी सिग्नल, इस्टर्न एक्सप्रेस हायवे, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२, महाराष्ट्र, भारत **दूर. क्र :** ०२२-४२४४११००
**ई-मेल :** secretarial@asianenergy.com **संकेतस्थळ :** www.asianenergy.com

**पोस्टल बॅलेटची सूचना**

१. सदस्यांना याद्वारे सूचित केले जाते की, वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ एकत्र वाचन, कलम १०८ आणि ११०, आणि कंपनी कायदा, २०१३ च्या इतर लागू तरतुदींनुसार, सेबी (सूचीबद्ध दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियम, २०१५ आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या परिपत्रक क्र. ०९/२०२४ दिनांक १९ सप्टेंबर, २०२४ चे पालन करून, भारत सरकार आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (‘सेबी’) द्वारे (यापुढे एकत्रितपणे ‘परिपत्रके’ म्हणून संबोधले जाईल), जारी परिपत्रक- सेबी/ एचओ/सीएफडी/ सीएफडी-पीओडी-२/पी/सीआयआर/ २०२४/ १३३ दिनांकित ३ ऑक्टोबर २०२४, इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया (‘एसएस-२’), सेबीचे नियमन ४४ (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन, २०१५ (‘लिस्टिंग रेग्युलेशन्स’) आणि इतर लागू कायदे, नियम आणि नियम (कोणत्याही वैधानिक बदलांसह वेळ लागू आहे), कंपनी पोस्टल बॅलेट नोटीस फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवेल ज्या सदस्यांचे ईमेल आयडी कंपनी/ डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदणीकृत आहेत आणि ज्यांची नावे **शुक्रवार, १५ नोव्हेंबर २०२४** रोजी (‘कट-ऑफ तारीख’) सदस्यांच्या नोंदणीवर/ लाभार्थी मालकांच्या यादीवर दिसतील. कंपनीच्या सदस्यांची पोस्टल बॅलेटद्वारे, केवळ दूरस्थ ई-मतदान प्रणालीद्वारे, व्यवसायासाठी, शक्य तितक्या व्यवसायासाठी मंजूरी मिळविण्यासाठी पोस्टल बॅलेट सूचनेमध्ये निर्दिष्ट करा. रिमोट ई-व्होटिंगबाबत तपशीलवार सूचना पोस्टल बॅलेट नोटिसमध्ये देण्यात येतील.
२. पोस्टल बॅलेटची सूचना कंपनीच्या संकेतस्थळावर www.asianenergy.com आणि स्टॉक एक्स्चेंजच्या संकेतस्थळांवर जसे, www.bseindia.com आणि www.nseindia.com यावरदेखील उपलब्ध असेल.
३. पोस्टल बॅलेट सूचना आणि कंपनीकडून भविष्यातील संप्रेषणे प्राप्त करण्यासाठी सदस्यांनी त्यांचे ईमेल पत्ते कंपनी/ डिपॉझिटरीजकडे खालील प्रकारे नोंदवले पाहिजेत:

**ईमेल पत्त्यांची नोंदणी/ अद्यतन करण्याची पद्धत**

- ज्या भागधारकांनी फिजिकल मोडमध्ये शेअर्स धारण केले आहेत आणि ज्यांनी त्यांचे ईमेल पत्ते अपडेट केलेले नाहीत त्यांना विनंती आहे की त्यांनी **www.asianenergy.com** वर कंपनीला लिहून शेअर होल्डरचे नाव आणि पत्त्याचा उल्लेख असलेल्या स्वाक्षरी केलेल्या विनंती पत्राच्या प्रतीसह भागधारकाच्या पत्त्याच्या समर्थनार्थ पॅन कार्डची स्वयं-साक्षांकित प्रत आणि कोणत्याही दस्तऐवजाची (उदा.: ड्रायव्हिंग लायसन्स, निवडणूक ओळखपत्र, पासपोर्ट, आधार) स्वयं-साक्षांकित प्रतीसह त्यांचे ईमेल अपडेट करावेत.
- डीमटेरिअलाइज्ड मोडमध्ये शेअर्स धारण करणाऱ्या शेअरहोल्डर्सना संबंधित डिपॉझिटरी सहभागींकडे त्यांचे ईमेल पत्ते नोंदणी/ अपडेट करण्याची विनंती केली जाते.

ई-व्होटिंगद्वारे मते देण्यासाठी लॉगिन क्रेडेन्शियल्स शेअरधारकांना वरील दिलेल्या पद्धतीने यशस्वीरित्या त्यांच्या ईमेल पत्त्यांची नोंदणी केल्यानंतर ईमेलद्वारे उपलब्ध करून दिली जातील.
ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याची तपशीलवार प्रक्रिया पोस्टल बॅलेटच्या नोटिसमध्ये प्रदान केली जाईल. तसेच कंपनीच्या वेबसाइटवर तपशील उपलब्ध करून दिला जाईल.

**एशियन एनर्जी सर्व्हिसेस लिमिटेडसाठी**
**सही/-**
**ठिकाण: मुंबई** **कु. श्वेता जैन**
**दिनांक: १४ नोव्हेंबर २०२४** **कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**